# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कोडोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0023 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/03/2023 23:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 02/03/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/03/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:21 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/03/2023 **Time (वेळ):** 18:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 036

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/03/2023 22:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आरळे फाटा सातवे, पन्हाळा, .

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रकाश हिंदुराव जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सातवे,पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सातवे,पन्हाळा,कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सिताराम पाटलु पोवार | | वडील का नाम : पाटलु पोवार | 1. गोसावी गल्ली,आरळे,पन्हाळा, कोडोली,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/रु दराच्या 03चलनी नोटा,500/रु दराच्या 14चलनी नोटा असे एकुण 13000/रु | 13,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

13,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्री.प्रकाश हिंदुराव जाधव, वय-35 वर्ष ,व्यवसाय-खाजगी व्यवसाय, रा.सातवे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर मो.नं. 9730327676 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की

मी दिनांक 24/02/2023 रोज़ी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक श्री सरदार नाळे यांचेसमक्ष हजर राहुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारीवर पुढील कारवाई करणेकरीता त्यांनी पोलीस निरीक्षक नितीन कुंभार यांना बोलावुन घेवुन त्यांना कारवाई करणेबाबत आदेशीत केले. त्यावेळी मी त्यांना माझी तक्रार सांगितली की, मौजे आरळे या ठिकाणी श्री खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्था मर्या, आरळे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर ही संस्था असून सदर संस्थेमध्ये मी तसेच माझा चुलत भाऊ श्री.राजेश ईश्वरा जाधव सभासद आहे. माझा भाऊ राजेश याचे सन 2021 चे पुरामध्ये मासेमारीचे जाळे खराब झाले होते त्याबाबतचा पंचनामा आमचे खंडोबा मच्छीमारी संस्था यांचेवतीने करून पाठविले होता त्याप्रमाणे माझा भाऊ राजेश याचे बॅक खात्यावर शासकीय अनुदानाचे 20000/- रूपये जमा झाले असुन सदर अनुदान जमा केले म्हणुन श्री खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्थेचे चेअरमन सिताराम पोवार यांनी माझेकडे 13,000/- रूपये लाचची मागणी केली आहे असे सांगून चेअरमन सिताराम पोवार यांच्यावर योग्य ती कारवाई होणेबाबत मी तक्रारी अर्ज दिला होता. त्यावेळी मी, पोनि कुंभार यांना मी ज्यावेळी चेअरमन सिताराम पोवार यांना भेटणेस जाणार आहे त्यावेळी आपणास कळवितो असे सांगीतले होते.

दिनांक 28/02/2023 रोजी मी, पोनि कुंभार यांना फोन करून दिनांक 01/03/2023 रोजी चेअरमन सिताराम पोवार यांना भेटणेस जाणार आहे. तरी तुम्ही या असे सांगीतले. दिनांक 01/03/2023 रोजी पोनि कुंभार साहेब तसेच त्यांचा स्टाफ व पंच असे 10.40 वाजता बोरपाडळे येथील नक्षत्र हॉटेल समोर आले. त्यानंतर ते सर्वजण माझे पाठोपाठ आड मार्गाने खंडोबा मंदिर मोहरे येथे आले. कुंभार साहेबांनी त्यांचे स्टाफ व पंचाची मला ओळख करून त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगीतली. चेअरमन सिताराम पोवार हे कोठे आहे ते पाहण्यासाठी त्यांना फोन लावला त्यावेळी त्यांनी ते बाहेरगावी गेले असुन उद्या सकाळी 10.00 वाजता भेटुया असे सांगीतले. त्याप्रमाणे मी, पोनि कुंभार साहेबांना सांगीतले. त्यानंतर मला गोपनियता राखणेबाबत सुचना देवुन ते सर्वजण उद्या परत खंडोबा मंदिर येथे येत असल्याचे सांगुन निघुन गेले.

दिनांक 02/03/2023 रोजी सकाळी 10.00 वा चे सुमारास कुंभार साहेब त्यांचा स्टाफ, पंच असे खंडोबा मंदिर येथे आले. त्यावेळी मला त्यांनी चेअरमन सिताराम पोवार यांना फोन लावणेस सांगीतला त्याप्रमाणे मी पोवार यांना फोन लावला असता ते बाहेरगावी गेले असुन सायंकाळी 04.00 वा चे सुमारास येत असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्वजण तेथेच थांबुन राहीलो. सायंकाळी 04.00 वा चे सुमारास मी, पोवार यांना फोन लावला असता त्यांनी आरळे ते सातवे फाटा येथे ते थोडयावेळात येत असुन तेथे भेटुया या असे मला सांगीतले. त्याप्रमाणे मी, पोनि कुंभार साहेबांना सांगीतले. त्यानंतर कुंभार साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचाना देवुन त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर प्रथम चेअरमन सिताराम पोवार यांची पडताळणी करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच नं.01 विरणक यांना योग्य त्या सुचना दिल्या त्यानंतर त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले मी व पंच नं. 01 विरणक माझेकडील चारचाकी गाडीमधुन सातवे गावाकडे निघालो त्या दरम्यान मी, पोवार यांना फोन करून पाच मिनीटात सातवे येथे पोहचत असल्याचे सांगीतले. आम्ही सातवे येथे पोहचलो तेथे चेअरमन सिताराम पोवार यांना भेटलो. आमच्यामध्ये माझा भाऊ राजेश याचे सन 2021 च्या पुरामध्ये मच्छीमारी करण्याचे जाळे खरांब झाले होते त्याअनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी मी त्यांना भाऊ रोजश याचे खात्यावर शासकीय अनुदान 20,000/- जमा झाल्याचे सांगीतले. त्यावेळी चेअरमन सिताराम पोवार यांनी अनुदान जमा केले म्हणुन माझेकडे 13000/- रूपये त्यानां दिले पाहिजेत अशी मागणी केली. त्यावेळी मी त्यांना तुम्ही येथेच थांबा मी थोडयावेळाने पैसे घेवुन येतो

असे म्हणुन तेथुन निघुन आलो. त्यानंतर आम्ही परत आलो. तेथे त्यांनी आम्हाला हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

त्यानंतर चेअरमन सिताराम पोवार यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 13000/- रूपयांच्या नोटांना अॅंथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अमंलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने पोनि कुंभार साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळ्यात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 विरणक असे माझेकडील चारचाकी वाहनाने चेअरमन थांबलेल ठिकाणी रवाना झालो. तसेच आमचे पाठोपाठ पोनि कुंभार साहेब, पंच नं.2 सौ मस्के व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सातवे ते आरळे जाणारे रोडजवळ येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी तेथे जावुन चेअरमन सिताराम पोवार यांना भेटलो त्यावेळी मी त्यांना 13000/- रूपये घेवुन आल्याचे सांगुन ते पैसे त्यांना देवुन ते पैसे मोजुन घ्या असे म्हणालो त्यावेळी त्यांनी पैसे हातात घेवुन ते मोजु लागले. त्यावेळी मी पैसे स्विकारले नंतरचा डावा हात डोक्यावरून फिरवण्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच पोनि कुंभार साहेब, पंच नं.2 सौ मस्के व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन चेअरमन सिताराम पोवार यांना पकडले. त्यावेळी मला पोनि कुंभार साहेब यांनी चेअरमन सिताराम पोवार यांना त्याचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव सिताराम पाटलु पोवार, वय 48 वर्षे, रा. गोसावी गल्ली, आरळे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर असे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही कोडोली पोलीस ठाणे जि कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली.

तरी माझा चुलत भाऊ श्री.राजेश ईश्वरा जाधव याचे सन 2021 चे पुरामध्ये मासेमारीचे जाळे खराब झाले होते त्याबाबतचा पंचनामा आमचे श्री खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्था मर्या आरळे ता पन्हाळा जि कोल्हापूर यांचेवतीने करून पाठविले होता त्याप्रमाणे माझा भाऊ राजेश याचे बॅक खात्यावर शासकीय अनुदानाचे 20000/- रूपये जमा झाले असुन सदर अनुदान जमा केले म्हणुन श्री खंडोबा सहकारी मच्छीमारी संस्थेचे चेअरमन सिताराम पोवार यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 13,000/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वतः स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी सिताराम पाटलु पोवार, वय 48 वर्षे, रा.गोसावी गल्ली, आरळे, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगीतलेप्रमाणे संगणकावर टंकलिखत केलेली असून ती मी वाचुन पाहीली असता ती बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Shitalkumar Anilkumar Doijad(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रभार हिंदुराव जाधव.

FIR प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shitalkumar Anilkum

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ठाणे अंमलदार
कोडोली पोलीस ठाणे